मे

> अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मनाचा गुण होय.

# श्री. ऋषि आणि त्यांची भुतावळ

कोल्पनिक पिशाचयोनीवर सत्ता चालवून आधुनिक वेताळ बनूं पहाणारे अनेक उपद्यापी लोक जगांत वावरत आहेत. त्यांसंबंधी आम्ही नुकताच जो लेख ' चित्रा ' साप्ताहिकांत लिहिला होता, त्याने या लोकांचे स्थानिक प्रतिनिधि श्री. वि. दा. ऋषि आणि त्यांचा शिष्यवृंद बराच क्षुब्ध झालेला दिसतो. त्यांपैकी श्री. जोशीराव नांवाच्या गृहस्थांनी आमच्या लेखाला उत्तर देण्याच्या निमित्ताने श्री. ऋषींची जाहिरात केली. त्यावर पुणें येथील संशोधक श्री. रा. ज. गोखले यांचें एक उत्तर प्रसिद्ध झालेंच आहे. दरम्यान श्री. ऋषि यांनीं स्वतःहि एक लेख ' सन्डे क्रॉनिकल ' मधें लिहिला आहे. हे लेख छापण्याबद्दल श्री. ऋषींकडून हे संपादक निदान जाहिरातीचा आकार तरी घेत असल्यास आमचें कांही म्हणणें नाही, एरवीं ' क्रॉनिकल ' चे संपादक स्वतःला बुद्धिप्रामाण्यवादी म्हणवीत असल्यामुळे वाचकांस याचें आश्चर्य वाटण्यास जागा आहे. श्री. जोशीराव यांनी ऋषींची बरीच स्तुति करून ऋषींची कर्तबगारी पाहण्याऐवजी आम्ही भुतांच्या अस्तित्वाबद्दल शंका दाखवतों याबद्दल आश्चर्य व्यक्त केलें आहे, आणि श्री. ऋषि हे आपली न्यायाधिशाची जागा सोडून या विषयाच्या अभ्यासाला लोककल्याणाकरतां लागले याबद्दल त्यांचा गौरव केला आहे. हें खरें असलें तरीहि त्यावरून भुतांचें अस्तित्व बिलकुल सिद्ध होत नाही, आणि चौकशीअंतीं आम्हास असें समजतें की वरील विधानहि सर्वस्वी खरें नाही. हा उद्योग सुरू करण्यापूर्वीच श्री. ऋषि सेवानिवृत्त झाले होते, निदान या विषयाचा प्रचार करण्याकरतां त्यांनी जागा सोडली नाही.

ऋषींची कर्तबगारी स्वतः पाहण्याचे बाबतींत आम्हास प्रसिद्ध गणितज्ञ प्वँकार यांनी अशा एका प्रसंगीं दिलेल्या उत्तराची आठवण होते. हे प्रयोग तुम्ही स्वतः कां पहात नाही, यावर त्यांनी सांगितलें ' ही सगळी फसवेगिरी आहे याबद्दल माझी खात्री आहे. मी अशा ठिकाणीं जायचें म्हणजे हे मध्यस्थ लोक कायकाय युक्त्या करतात तें शोधून काढण्याकरतां जायचें. परंतु त्याला अतिशय तीक्ष्ण इंद्रियें असलेल्या मनुष्यानें डोळ्यांत तेल घालून पहात बसणें जरूर आहे. मला तें शक्य नाही, यामुळे माझी फजितीच होईल. '

श्री. ऋषि फसवे आहेत असें अर्थातच आम्हास म्हणतां येत नाही. कदाचित् ते स्वतःची फसवणूक करून घेत असतील ही शक्यता आम्हास धरून चाललेंच पाहिजे. आतां यामुळे श्री. ऋषींचा मूर्खपणा सिद्ध होऊं लागला तर त्याला आमचा इलाज नाही. श्री. ऋषींसंबंधी आणखी अशीहि माहिती मिळते की त्यांची अनेक ठिकाणीं प्रयोगांचे बाबतींत फजीति झालेली आहे. लोकमान्य टिळकांच्या मृतात्म्याला त्यांनी पुणें मुक्कामीं गायकवाड वाड्यांत येण्याकरतां आव्हान दिलें असतां अशा ओळखीच्या ठिकाणीं देखील तो मृतात्मा बिलकुल आला नाही, निदान कोणी तोतया येऊन त्यानें खोटीं उत्तरें दिलीं. अर्थात् केव्हाही विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें जमलीं तर तो मृतात्म्यांच्या अस्तित्वाचा पुरावा होतो, आणि न जमलीं तर मृतात्मे एखादे वेळीं फसवून खोटीं उत्तरें देतात, किंवा बोलावलें तरी येतच नाहीत, वगैरे पळवाटा जय्यत तयार असतात. तेव्हा श्री. ऋषींना याची अडचण कधीच भासत नाही. मात्र असल्या लपंडावांनी कोणतेंहि शास्त्रीय सत्य सिद्ध होत नसतें, हें कळण्याइतकें त्यांना शास्त्रीय पद्धतींचें ज्ञान नाही, असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें. याच प्रसंगीं सौ. ऋषींच्या अंगांत एक मुसलमान मृतात्मा संचारला असतां व त्याचा संदेश त्यांनी ऊर्दू लिपींत लिहून दाखवावा असें एकानें सांगितलें असतां, सौ. ऋषींना ऊर्दू लिपि येत नाही, तेव्हा ती त्यांनी कशी लिहावी, अशी सबब श्री. ऋषींनी सांगितली. परंतु कित्येक वेळां मध्यस्थाला येत नसलेली भाषा बोलणें किंवा लिपि लिहिणें हाच एक मृतात्म्यांचा चमत्कार म्हणून दाखवायला हे लोक कमी

करीत नाहीत. असली हातचलाखी जेथे करावी लागते, तेथे परलोकविद्या ही विद्या आहे, कला आहे, कसब आहे, जादू आहे, हें कोणी कदाचित् कबूल करील, पण त्यांत कांही शास्त्रीय सत्य आहे असें कोणीहि म्हणू शकणार नाही.

श्री. ऋषींच्या प्रामाणिकपणाची आणखी एक गोष्ट सांगतों. हे गृहस्थ व त्यांच्या निष्णात पत्नी यूरोपच्या वार्षिक सफरीला जात असतां एके वर्षी त्याच बोटीवर डॉ. इरावती कर्वे (सध्यां डेक्कन कॉलेजच्या नवीन संशोधनसंस्थेंत काम करीत असलेल्या ) प्रवास करीत होत्या. बोटीवर श्री. ऋषि व ऋषिपत्नी यांच्या कांहीं बैठकी होणार आहेत अशी बातमी लागल्यावरून त्यांनी श्री. ऋषि यांना आगाऊ सांगून ठेवलें होतें की ' मला आपल्या बैठकींना हजर राहण्याची प्रबल इच्छा आहे, जेव्हा त्या होणार असतील तेव्हा कृपा करून मला कळवा. ' या प्रवासाला निदान दहाबारा दिवस लागतात, आणि या अवधींत श्री. ऋषि यांनी अनेक बैठकी केल्या, परंतु त्यांनी त्यांना एकदां देखील कळवण्याची तसदी घेतली नाही, आणि प्रवास संपतांना इरावतीबाईंनी त्यांना याचें कारण विचारलें असतां त्यांनी सांगितलें की ' तुम्ही मला कोठे सांपडलां नाहीत. ' यूरोपच्या बोटीवर असलेला प्रवासी सांपडत नाही ही अशक्य गोष्ट आहे. ही खोटी सबब सांगण्याचें कारण कोणालाहि सहज समजण्यासारखें आहे की श्री. ऋषींना तेथे चिकित्सक लोक नको असतात, अंधविश्वास ठेवणारेच पाहिजे असतात, आणि केवळ शिष्टाचार म्हणून ते खोटें बोलले. हल्ली न्यायखात्यांत उच्च स्थानीं असलेले आमचे एक मित्र श्री. ऋषींच्या मुंबईच्या आश्रमांत एकदां हजर राहिले असतां त्यांचीहि खात्री होण्यासारखें तेथे कांही घडलें नाही. अर्थात् तुम्ही याल तेव्हा कांही घडेलच असें कांही नाही, अशी एक पळवाट असतेच. अशा स्थितींत आमच्यासारखे लोक तेथे जाणें हा कालाचा अपव्यय समजतात यांत जोशीरावांना आश्चर्य कां वाटतें तें समजत नाही.

जोशीरावांनी आमच्या मागच्या एका लेखाचे बाबतींत आमची टर उडवण्याचा प्रयत्न केला आहे, तो कितपत यशस्वी झाला आहे हें वाचकांनीच ठरवावें. येथे तिसऱ्या इयत्तेंत असलेला एक मुलगा मेला तेव्हा तो परलोकांत

चवथ्या इयत्तेंत बसला, अशी बातमी श्री. ऋषींनी प्रसिद्ध केली आणि तेथील अभ्यासक्रमाविषयींही त्यांनी कांही माहिती दिली होती. आम्हीं साहजिकच विचारलें की तेथील शाळेंत स्टॅंडर्ड टाइमच वापरतात की काय? हा प्रश्न श्री. जोशी-रावांचें मतें हास्यास्पद आहे. आमचे मतें तो अगदी साहजिक उपस्थित होणारा प्रश्न आहे आणि अजूनहि आम्हास त्यांत कांही हास्यास्पद दिसत नाही. पर-लोक हा या जगाची हुबेहुब प्रतिमा आहे असें श्री. ऋषि सांगतात, तेव्हा पर-लोकांतील हिंदुस्थानांत इंग्रजांचेंच राज्य आहे की काय असेंहि आम्हीं विचारलें होतें, आणि अजूनहि विचारतों. स्वतः हास्यास्पद विधानें करणारांना त्यांवर आधारलेले प्रश्न मात्र हास्यास्पद वाटतात हें आश्चर्य आहे.

श्री. ऋषींचे दुसरे पुरस्कर्ते श्री. कानविंदे नांवाचे गृहस्थ आहेत. त्यांनी डॉ. चिटणिसांना उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे, परंतु त्या उत्तरावर विश्वास ठेवणें कठिण आहे. ते म्हणतात की कांही लोकांनी श्री. ऋषींना गराडा घालून त्यांचेकडून एक कबुलीजबाब लिहून घेतला, आणि नंतर श्री. ऋषींनी ही हकीकत पोलिसाला सांगून तो परत मिळवला, परंतु दरम्यान सदर लोकांनी त्याचें छायाचित्र घेऊन ठेवलं आणि त्याचा ते दुरुपयोग करतात. सदर लोकांवर श्री. ऋषींनी कायदेशीर इलाज कां केला नाही? त्यांनी जर पोलिसांकडे तक्रार करून कबुलीजबाब परत मिळवला, तर त्याच वेळीं पोलिसाकडून खटला करायला पाहिजे होता. यांत कांहींतरी अधिक भानगड आहे हें यावरून उघड होतें. श्री. ऋषि अनेक ठिकाणीं व्याख्यानें देतात, हा एक पुरावा त्यांनी मांडला आहे. त्या व्याख्यानांना जाऊन डॉ. चिटणीसांनी आपली संशय-निवृत्ति करून घ्यायला पाहिजे होती असें ते म्हणतात. वर ज्या पळवाटा आम्ही दाखवल्या आहेत त्या व्याख्यानांतहि असताततच, तेव्हा अशा व्याख्या-नांना कोणीहि समंजस मनुष्य जाणार नाही, अंधविश्वास ठेवणारेच जातील.

सर ऑलिव्हर लॉज आणि सर ऑर्थर कॉनन डॉईल यांची नांवें या बाबतींत हे लोक नेहमी सांगतात, आणि यावर आम्ही 'सायकिकल रिसर्च

सोसायटी'चे अध्यक्ष प्राइस यांचें मत दिलें होतें की या दोघांनाही फसवेगिरी ओळखण्याची बिलकुल ताकत नव्हती, आणि त्यांच्या बावळटपणाचीं अनेक उदाहरणेंहि दिलीं होतीं (शिवाय डॉईल हे शास्त्रज्ञ नव्हत). तरीदेखील जोशीराव पुन्हा त्यांचींच नांवें पुढे करतात! जोशीरावांना किंवा श्री. ऋषींना वरील गृहस्थांपेक्षा त्यांत कांही जास्त कळतें असें समजण्याचें कारण दिसत नाहीं. प्राइस हे या विषयांतील तज्ञ असून शिवाय ते या दोन्ही विद्वानांच्या प्रत्यक्ष ओळखीचे होते, तेव्हां आतां त्याचीं नांवें पुढें करण्यान श्री. जोशीराव स्वतःला मात्र हास्यास्पद करून घेत आहेत. शास्त्रज्ञांचीं नांवें लोकांना भुलवायला उपउपयोगी पडतात हें खरें, परंतु असल्या बावळट शास्त्रज्ञांच्या नांवांनी कांहीहि सिद्ध होत नाही. अगोदर लुच्चेगिरी हुडकून काढणें हें काम शास्त्रज्ञांचें नव्हे, तें धंदेवाईक जादूगारांचें आहे, आणि त्यांनी सर्वांच्या युक्त्या बाहेर काढल्या आहेत. आतां शास्त्रज्ञांचीं नांवें सांगणें म्हणजे लोकांच्या डोळयांत धूळ टाकणें आहे. त्यांनी जे फसतील त्यांची फसण्याचीच इच्छा असते म्हणून ते फसतात.

वर उल्लेखिलेल्या अध्यक्षांनी स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे की मृतात्म्यांचे फोटो ही शुद्ध लबाडी आहे, आणि तरीदेखील श्री. ऋषि क्रॉनिकलमधील लेखांत एक फोटो छापतात. यावर त्यांचा स्वतःचा विश्वास असल्यास हा त्यांच्या बावळटपणाचा पुरावा आहे इतकेंच. शिवाय ते आपल्या लेखांत या विषयांतील तज्ञांचीं मूलतत्वें काय आहेत तीं सांगतात, आणि तीं अनेक लोकांनी पुनः पुनः सांगितलेलीं आहेत एवढ्यावरून तीं खरीं समजावीं असें आपलें मत सांगतात. तीं अशीं. १. ईश्वर सर्वांचें आदिकारण आहे. २. मनुष्याच्या शरीराशिवाय त्याला एक बरोबर तसेंच हवामय शरीर असतें (ईथेरिक बॉडी). ३. मनुष्य मेल्यावर तें जिवंत राहतें. ४. त्याला पूर्वीच्या जीवनाची आठवण असते. ५. त्यांच्याशीं आपल्याला संभाषण करतां येतें. ६. वैयक्तिक जबाबदारी. ७. अशा अनेकपदरी जीवनामुळे प्रगति होते.

या लोकांच्या अर्थहीन शब्दजालाचें भाषांतर करणें कठिण आहे. वरील शब्दांचा अर्थ कोणास न कळला तर त्याला आमचा इलाज नाही. ज्याचा अर्थ

कळणार नाही अशा गोष्टींना गूढ, आध्यात्मिक वगैरे शब्द लावण्याचा प्रघात आहे, आणि त्यांत कांहीं उच्च प्रकार आहे अशी लोकांची समजूत असते. या सर्वांत महत्वाचा मुद्दा असा आहे की मनुष्याच्या ज्या ज्या शक्ति आहेत त्या सर्व शरीरावर अवलंबून आहेत. मेंदू असल्याशिवाय विचार करतां येत नाही आणि स्मरणशक्तिही शक्य नाही, आणि हे लोक तर म्हणतात की मेल्या-नंतर विचार करतां येतो, इतकेंच नव्हे तर आपले विचार दुसऱ्याला कळवतां येतात. ही अनवस्था टाळण्याकरतां या लोकांनी एक अशरीरी शरीर मानलें आहे. एकदां खोटें बोललें म्हणजे तें सांवरण्याकरतां आणखी अनेक खोट्या गोष्टी रचाव्या लागतात, तशी या लोकांची स्थिति झाली आहे. आत्मा, ईश्वर वगैरे पुरातन थापांनी यांचें समाधान न होऊन ते आणखी नवीन थापा देऊं पाहतात. परंतु आतां पूर्वीचें युग राहिलें नाही, आणि नादान लोकांशिवाय त्यांवर कोणी विश्वास ठेवीत नाही. मात्र या बाबतींत सर ऑलिव्हर लॉज सारखे लोक नादान कसे बनतात, याचा पुरावा 'सायकिकल रिसर्च सोसा-यटी'च्या अध्यक्षपदाला पोंचलेल्या प्राइससारख्या गृहस्थांनी दिलेला आहे.

पृथ्वीवर ज्या गोष्टी सांपडतात त्याच सामान्यतः विरल स्वरूपांत श्री· ऋषींच्या परलोकांत सांपडतात असें ते म्हणतात. खुर्च्या टेबलें मेलीं, म्हणजे त्यांचे मृतात्मे परलोकांतील ( माणसांच्या ) मृतात्म्यांच्या उपयोगी पडतात असें दिसतें ! श्री. ऋषींचा लेख अशा प्रकारच्या मूर्खपणानें इतका ओतप्रोत भरलेला आहे, की तो वाचणें म्हणजे कोणाहि माणसाला शिक्षा वाटेल. श्री. ऋषि म्हणतात की परलोकविद्येचा मोठा उपयोग आहे. तें तर आम्हालाहि उघड दिसतें आहे. ज्योतिषाप्रमाणेच हाहि एक पोट भरण्याचा धंदा आहे, आणि अनेक मध्यस्थ यावर गबर झालेले आहेत यांत शंका नाही. अर्थात् श्री. ऋषि हे अत्यंत स्वार्थत्यागी आणि थोर गृहस्थ आहेत, ते हा धंदा अर्थातच केवळ परोप-काराकरतांच करीत आहेत, आणि ते विलायतेकडे सफरी करतात त्याहि चैनीं-करतां नसून त्यांच्या मतानें एका जागतिक महत्कार्याला मदत करण्याकरतांच करतात. तथापि कोणाहि समंजस मनुष्याला यांतलें थोतांड स्पष्ट समजण्या-

सारखें आहे. श्री. ऋषींना तेवढी अक्कल नसली तर त्याला आमचा इलाज नाही.

आम्ही मागें ज्यावेळीं या मासिकांत या विषयावर लेख लिहिला, तेव्हा श्री. ऋषींचे एक चेले आमचेकडे वाद करण्याकरतां आले होते, आणि आपण प्रत्यक्ष येऊन पहा अशी विनंति केली होती. त्या वेळीं आम्ही त्यांस एक आव्हान दिलें होतें तेंच पुन्हा देतों. मृतात्यांना जर माहीत नसलेल्या गोष्टी कळतात, तर माझ्या खिशांतलें पुस्तक त्यांना वाचतां आलें पाहिजे, आणि अशा रीतीनें वाचतां येतें असें अनेक मध्यस्थांचें म्हणणें आहे असा प्रयोग श्री. ऋषि करून दाखवण्यास तयार असल्यास आम्ही येण्याची तसदी घेऊं, तशी तयारी झाली म्हणजे कळवा, असें त्यांस सांगितल्याला आज कित्येक वर्षे झालीं, परंतु ते उपस्थित झाले नाहीत. श्री. ऋषींच्या किंवा त्यांच्या मध्यस्थाच्या अंगांत तशी शक्ति नसल्यास मात्र आमचा वेळ फुकट घालवण्याची आमची तयारी नाही. उत्तरें जमली तर जमलीं, बोलावलेला मृतात्मा आला तर आला नाहीतर त्याची लहर लागत नाही, उत्तरें न जमल्यास त्याने फसवलें असेल, अशा प्रकारचा लपंडाव पाहण्याची आमची इच्छा नाही.

मुंबईच्या कालेजांतील मानसशास्त्रज्ञांना पंच नेमून त्यांच्या समक्ष मध्यस्थाला अज्ञात अशी माहिती मृतात्म्यांचे साहाय्याने देण्यास श्री. ऋषि तयार असतील, तर तसा पुरावा झाल्यास श्री. रा. ज. गोखले यांच्या पुणें येथील संस्थेने शंभर रुपयांचें बक्षिस लावलेलें आहे, तें येथें त्यांच्या परवानगीने पुनः जाहीर करीत आहों. तोंडच्या वल्गनांनी कांही सिद्ध होत नसतें. व्याख्यानबाजीनें ईश्वराचेंहि अस्तित्व सिद्ध होत नाही आणि मृतात्म्यांचेंही नाही. अशा गप्पा आम्ही पुष्कळ ऐकल्या आहेत. त्या आणखी श्री. ऋषींच्या तोंडूनच ऐकण्यांत काय स्वारस्य आहे, म्हणून आमच्यासारख्या लोकांनी जावें? श्री. कानविंदे म्हणतात डॉ. चिटणिसांनी व्याख्यानांना जाऊन आपलें शंकानिरसन करून घ्यायचें होतें. शंका असेल तरचा तो प्रश्न आहे. आम्हाला शंका बिलकुल नाहीं. हें सर्व थोतांड आहे अशी आमची खात्री आहे, मग शंकानिरसनाच, प्रश्नच रहात नाही. पुष्कळ उत्तमोत्तम वक्ते अशा विषयांवर बोललेले आहेत आणि बोलतात. त्यांपुढे श्री ऋषींचा काय पाड?

---

# भिन्न गोष्टी!

लेखकः—ना. के. शिरोडकर

बोरिवलीच्या त्या अवाढव्य बंगल्यांत शामाला एकटी राहतांना जेव्हां शेजारच्या लोकांनीं पाहिलें, तेव्हा त्याचें बहुतेकांना नवल वाटलें. त्यापूर्वी ती मुंबईला भाई जीवनजीच्या गल्लींत स्वतःच्या मालकीच्या घरांतील एका ब्लॉकमधें रहात होती. त्या घराला एकंदर सहा ब्लॉक होते. सहा महिन्यापूर्वीच तिचे वडील अर्धांगवायूच्या विकाराने वारले होते आणि घरांत नात्याचें असें दुसरें माणूस कोणी नव्हतें. शिवाय शामा अविवाहित होती. तिची तिशी तर कधीच उलटली होती.

शेजारच्या पुष्कळ स्त्रिया तिच्याकडे गप्पा मारायला येत, आणि शिष्टाचाराचें उल्लंघन होऊं नये म्हणून पुष्कळदां अशा स्त्रियांशीं तिला समरस व्हावें लागे. त्या स्त्रियांच्या संभाषणाचा विषय काय, तर कुणाच्या तरी उखाळ्यापाखाळ्या काढणें अगर कोणतेतरी गंजलेले विषय पुन्हापुन्हा चर्चेला घेणें. शामाला या गोष्टीचा मनस्वी कंटाळा होता, तरीहि तिला पुष्कळदां मनाविरुद्ध वागावें लागे.

अलीकडेच आपण आपला मुंबईचा मुक्काम हालवावा असें तिला वाटूं लागलें होतें. त्याला कारणहि होतें. नुकतीच शामाची आणि नाटक कंपनींतील एका नटाची ओळख झाली होती. हा नट पूर्वी एका महाराष्ट्रीय नाटक कंपनींत काम करीत असे. थोड्याच महिन्यांपूर्वी ती नाटक कंपनी बंद झाली आणि दुर्गारामची (त्या नटाची) नोकरीहि पण सुटली. आणि योगायोग असा की लवकरच त्याची शामाशी ओळख झाली. आपण नोकरीच्या खटपटींतच आहों, एका फिल्म कंपनींत लवकरच जुळेल असें वाटतें, वगैरे बातमी तो तिखटमीठ लावून शामाला सांगे. त्याची पंगतहि अलीकडे शामाकडेच पडत असे. दुर्गारामाची त्या वेळची

परिस्थितिच एकंदरींत कींव करण्यासारखी होती. शामालाहि अनायासेंच एक नवीन मित्र लाभला. शेजारच्या बायकांचीं तींचतींच बोलणीं ऐकून कंटाळलेल्या शामाला दुर्गारामच्या सहवासांत एक प्रकारचें नाविन्य व आपुलकी वाटूं लागली. तो तिला नाटक कंपनींतील मजेदार अनुभव सांगायचा. एकदां कंपनींतील स्त्रीपार्टी नट बेफाम दारू पिऊन तर्र झाल्यामुळे शेवटीं त्याची ती स्त्रीभूमिका आपण स्वतःकडे घेऊन प्रेक्षकवर्गातील कित्येक स्त्रियांना आपण कसें वेडें करून सोडलें याचें रसभरित वर्णन करून शामाला त्याने अगदी थक्क करून सोडलें होतें. कांही कां असेना, शामाला या गोष्टी अगदी मनापासून आवडत हें खास.

बाहेर पौर्णिमेचें चांदणें पसरलें होतें. अशा एका रात्रीं ती दुर्गारामसह सहल करायला निघाली असतांना त्याचा हात आपल्या हातीं घेऊन शामा दुर्गारामला म्हणाली, ' खरेंच तुम्ही किती चांगले आहांत ! ' त्याच दिवशीं तीं दोघें एकमेकांच्या प्रेमांत सांपडलीं, आणि लवकरच शामाला वाटूं लागले की आपण मुंबईहून बाहेरगांवीं कुठेतरी रहायला जावें.

तिच्या मालकीचा एक बंगला बोरिवलीला होता. योग्य भाडेकरी न मिळाल्यामुळे तो बरेच महिने रिकामा राहिला होता. शेवटीं विचार करून तिने त्याच बंगल्यांत जाऊन राहण्याचें निश्चित केलें. लगेच ती त्या तयारीलाहि लागली, आणि थोड्याच दिवसांत ती बोरिवलीच्या बंगल्यांत रहायलाहि आली.

बंगला बराच मोठा होता. यामुळे एवढ्या बंगल्यांत ती एकटी कशी राहूं शकते याचें पुष्कळांना नवल वाटे. बंगल्याची बाग शिंपायला एक धडधाकट माळी व घरांत सुटें काम करणारी मोलकरीण, एवढीं दोनच माणसें काय तीं तिच्याकडे नोकरीला होतीं. येथे रहायला येतांच भाई जीवनजीच्या गल्लींतला आपला ब्लॉक तिने भाड्याने देऊन टाकला होता.

शामा स्वयंपाक स्वतःच्या हातांनी करी. तिला स्वयंपाक करण्याची संवय होती, आणि या शास्त्रांत ती बरीच निष्णात असल्यामुळे तिच्या हातचा स्वयंपाक फारच रुचकर होई.

दुर्गाराम एक खोली भाड्याने घेऊन मुंबईलाच रहात होता. शामाकडे वास्तव्य करायला तो नाखुष होता असें नव्हे. त्याची त्याला केव्हाहि तयारी होती, पण शामालाच तें नको होतें. ' तुम्ही आणि मी एकत्र राहणें लोकदृष्टीला मानवणार नाहीं ' असें एकदां ती दुर्गारामला म्हणाली होती, आणि तेवढ्याच-मुळे त्याला मुंबईला रहावें लागत असे. त्याचा बहुतेक सर्व खर्च शामाच करीत असे, कारण त्याला नोकरी नाही हें तर तिला स्पष्टच दिसत होतें.

इतकें होतें तरी बोरिवलीला शामाकडे दुर्गारामच्या नेहमीच खेपा पडत. रात्रीच्या वेळेला तेवढाच तो तिच्याकडे रहात नसे. एरवीं दिवसाचे बहुतेक तास तो शामाकडेच पडून राही. तो आपला एक जिवलग स्नेही आहे एवढेंच शामा त्याचे संबंधी लोकांना सांगत असे.

२

एका मराठी दैनिकांत आज पुढील जाहिरात होती:—

" **पाहिजेत.** आधुनिक पद्धतीचीं नाटकें करण्याच्या हेतूने नुकत्याच मुंबईत स्थापन झालेल्या एका महाराष्ट्रीय कंपनीसाठी उत्तम मराठी बोलूं शकणारे नटनटी पाहिजेत. "

ही जाहिरात जेव्हा दुर्गारामच्या पाहण्यांत आली, तेव्हा या कंपनीकडे नोकरीसाठी एक अर्ज खरडून त्याने पोस्टांत टाकला. एकदोन दिवसांतच त्याचें रीतसर उत्तरहि आलें. त्यांत त्याला समक्ष येऊन भेटण्याविषयी कंपनीच्या मॅनेजरने लिहिलें होतें. शेवटीं नोकरीचें निश्चित होऊन मासिक १२५ रुपये पगारावर प्रमुख नट म्हणून दुर्गारामची त्या कंपनींत नेमणूकहि पण झाली. इतकेंच नव्हे तर त्या कंपनीच्या पहिल्या नाटकाला रीतसर सुरवात होऊन दुर्गारामने आपला पहिला पगार पण पटकावला. या नाटकांतील नायकाची भूमिका दुर्गारामकडे होती, आणि ती पुन्हा पुन्हा डोळ्याखालून घालण्यासाठी शामाने तें नाटक कांही नाही तरी ७–८ वेळां फुकटांत पाहिलें होतें.

हल्ली दुर्गारामला वाटे की आपण आतां शामाशीं लग्न करायला काय

हरकत आहे ? तो मनाशीं म्हणे देखील, 'शामाशीं आपण चोरून संबंध ठेवण्यापेक्षा तिच्याशीं आपण राजरोस लग्न लावणेंच अधिक योग्य नव्हे काय ? शिवाय आपण आज पूर्वीप्रमाणे बेकार नाही.' ही विचारसरणी सुरू झाली की आपल्या व शामाच्या लग्नांत एखादी अडचण उद्भवेल अशी त्याला शंका देखील येत नसे. उलट त्याबाबत मनांतून निर्धास्त बनून आपला आणि शामाचा प्रेमसंबंध त्याने आपल्या कित्येक मित्रांना व नाटककंपनींतील एका नटीला बोलूनहि दाखवला होता. इतकेंच नव्हे तर आपल्या भावी लग्नाची बातमी त्याने उत्साहाच्या भरांत आपल्या एका संपादक मित्राला कळवून ती छापण्याविषयी त्याला विनंतिहि केली होती. आणि हा सगळा उपद्व्याप केल्यावर लग्नासंबंधी शामाचें मत घेण्याकरतां म्हणून बोरिवलीला येऊन त्याने तिला प्रश्न केला होता, 'शामा, माझ्या मनांत तुझ्याशीं लग्न करायची इच्छा आहे.'

दुर्गारामला वाटलें होतें की ती त्यावर उत्तरेल, 'दुर्गाराम, तुमच्या प्रेमांत सांपडल्यापासून शामाला मुळी निराळें अस्तित्वच राहिलेलें नाही. तुम्ही आणि मी वेगळीं आहोंत ही कल्पनाच मला आतां सहन होणार नाहीं. तुम्ही म्हणाल त्या क्षणीं शामा तुमची आहे.'

पण शामाने त्याला उत्तर दिलें तें अगदीं याच्या विरुद्ध. ती म्हणाली 'दुर्गाराम, प्रेम आणि लग्न या दोन गोष्टी अगदी भिन्न आहेत. लग्नांत प्रेम सांपडतेंच असें नाही. आणि पुष्कळ वेळां प्रेमाला लग्न मानवत नाही. वास्तविक माझ्याशीं लग्न करायची कल्पनाच तुम्हीं डोक्यांत आणायला नको होती.'

दुर्गारामला त्या वेळीं काय बोलावं हें समजेना. तो निरुत्तर झाला. त्या दिवशीं शामासह खाल्लेल्या अन्नाचा ताजा ताजा घासहि त्याला गोड लागला नाही.

३

दुर्गारामशीं असलेला आपला चोरटा प्रेमसंबंध अलीकडे उघडकीस येऊं लागला आहे असें आतांशा शामाच्या प्रत्ययास येऊं लागलें होतें. तिच्या परिच-

यांतील एकदोन स्त्रियांनी तर तिला यासंबंधी विचारायलाहि कमी केलें नव्हतें. या बातमीला कोठून आणि कसें तोंड फुटलें असावें, यासंबंधी जेव्हा शामा खोलांत शिरूं लागली, तेव्हा ती दुर्गारामचीच चुक असली पाहिजे याबद्दल तिची खात्री हळूहळू बळावतच चालली, आणि कांहीं दिवसांनी जेव्हा आपल्या आणि दुर्गारामच्या भावी लग्नाची बातमी तिने एका दैनिकांत वाचली, तेव्हा तर ती थक्कच झाली! लगेच तिने त्या दैनिकाच्या संपादकाला पत्र पाठवून ती बातमी आपणास कोणीं पुरवली म्हणून विचारलें, तेव्हा तिला उत्तर मिळालें, 'दुर्गारामकडून!'

त्याच वेळीं बंगल्याच्या माळ्याला हांक मारून तिने त्याला हुकूम सोडला की 'याउपर दुर्गाराम तुला कधी बंगल्यांत शिरतांना दिसले तर त्यांना त्या क्षणींच हाताला धरून वाटेला लाव.' आणि हा हुकूम मिळाल्यानंतर अर्ध्या तासानंतरच जेव्हा त्याला दुर्गाराम बंगल्यांत शिरतांना दिसला, तेव्हा त्याने चटकन् पुढे होऊन त्याच्या दंडाला धरून त्याला कंपाउंडाबाहेर ढकलून दिलें आणि आंतून दरवाजा लावून घेतला.

दुर्गारामाच्या आश्चर्याला सीमा राहिली नाही. त्याने गोंधळून विचारलें 'हें काय?'

'बाईसाहेबांचा हुकूम!' माळी तोऱ्यांत उत्तर देऊन मोकळा झाला.

---

# सातपुड्यांतील बैगा लोक

मध्यप्रांतांतील मंडला, बिलासपूर व जबलपूर जिल्ह्यांतील डोंगराळ प्रदेशांत मुख्यत्वें वास करणारा 'बैगा' नांवाचा एक समाज आहे. हे लोक हिंदुस्थानांतील मूळच्या रहिवाश्यांपैकी असावेत असा संशोधकांचा अंदाज आहे. तथापि गोंडांच्या आणि हिंदूंच्या सहवासाने त्यांची मूळची भाषा समूळ नष्ट

होऊन ते आतां जवळजवळ हिंदीच बोलतात. अर्थात् त्यांच्या चालीरीतींवरहि या सान्निध्याचा बराच परिणाम झालेला आहे, परंतु भाषेच्या मानाने फारच कमी झाला आहे, आणि या दृष्टीने हे लोक अजून प्राथमिक अवस्थेतच आहेत असें म्हणावें लागतें. त्यांच्या चालीरीतींचा अभ्यास करण्याकरतां एलविन् नांवाच्या एका यूरोपीय गृहस्थांनी त्यांची भाषा शिकून, त्यांच्यांत शक्य तितके मिसळून, १९३२ च्या आरंभापासून सहा वर्षेपर्यंत त्यांच्यांतच राहून जी माहिती मिळवतां आली ती आतां एका ५५० पानांच्या ग्रंथांत प्रसिद्ध केली आहे. प्रसिद्ध संशोधक डॉ. मॅलिनौस्की यांनी ट्रोब्रिअंड् बेटांसंबंधी लिहिलेल्या ग्रंथाच्याच पद्धतीने हा ग्रंथ लिहिलेला आहे आणि मनुष्यजातीच्या वेगवेगळया गटांची उत्क्रांत कसकशी होत गेली हें अशा माहितीवरून उत्तम रीतीने समजतें.

हे लोक मुख्यतः शिकार करून राहणारे आहेत. ते थोडेबहुत शेतकीहि करतात, परंतु त्यांना नांगराची माहिती पूर्वी नव्हती आणि अजूनहि ते नांगर वापरीत नाहीत. ते सर्व प्रकारचें मांस खातात. गोमांसहि खात असत, परंतु हिंदूंच्या सहवासाने त्यांना आतां त्याची लाज वाटते आणि तें चोरून खाल्लें तरी ते कबुल करीत नाहीत. त्यांना उंदीर, खार, वगैरे बारीक प्राणीहि खायला आवडतात, आणि त्यांना उंदरांच्या एकवीस जाती माहीत आहेत. शिकारींविरुद्ध सरकारी कायद्यांमुळे त्यांचे हाल होतात आणि त्यांना बहुतांशीं पेजेवर रहावें लागतें. तरी देखील ते चोरून शिकार करतात आणि कंदमुळेंहि खातात. धनुर्विद्येंत ते प्रवीण असतात, यामुळे शिकार सहज करूं शकतात. ते मासेहि खातात, परंतु त्यांना तें विशेष प्रिय नसतात.

त्यांच्या कामविषयक चालीरीतींवर हिंदूंच्या सहवासाचा बिलकुल परिणाम झालेला दिसत नाही. विवाहाची पद्धत आहे इतकेंच नव्हे तर बहुधा कोणी अविवाहित रहात नाही, परंतु विवाहापूर्वीहि त्यांना जवळजवळ पूर्ण स्वातंत्र्य असतें आणि विवाहापर्यंत कोणतीहि मुलगी कुमारी रहात नाही. तरीपण ती कुमारी असल्याचें ढोंग मात्र करते. विवाहानंतरहि स्त्री कोणाहि

दुसऱ्या माणसाबरोबर निघून जाऊं शकते आणि पुरुष वाटेल तेव्हां दुसरी बायको करूं शकतो. विवाहाने स्त्रीला अधिक स्वातंत्र्य मिळतें, कारण विवाहापूर्वी प्रेमलीलांना जरी परवानगी असली, तरी घरच्या सगळ्या माणसांपासून चोरूनच त्या कराव्या लागतात, परंतु लग्नानंतर फक्त नवऱ्यापासूनच त्या लपवून ठेवाव्या लागतात. म्हणजे त्यांच्यांत टिकाऊ विवाह नसतातच असें नाही, पण तें केवळ दोघांच्या पसंतीवरच अवलंबून राहतें, त्यांत कोणावरहि जुलूम होत नाही. एक नवरा मेल्यावर पुनः लग्न करण्याची पद्धतच आहे आणि करीत नाहीत अशा फारच थोड्या.

काडी मोडण्याचीहि पद्धत आहे. नवराबायको पंचांपुढे जाऊन एक काडी मोडतात आणि काडीचे दोन तुकडे जमिनीवर वेगवेगळे पडूं देतात. त्याचप्रमाणे एक मडकें फोडतात ( घटस्फोट ) आणि एक रुपयाहि जमिनीवर टाकतात, परंतु पंचांपैकी कोणीतरी तो उचलतो आणि त्यांतून पंचांना मेजवानी होते. नंतर त्यांचा एकमेकांवर कोणताहि हक्क नाही असें पंच जाहीर करतात. नवऱ्याने बायकोला कांही दागिने दिलेले असल्यास ते या वेळीं परत करावे लागतात. बायको कोणाबरोबर पळून गेल्यास त्या मनुष्याने तिच्या नवऱ्याला पंचवीस रुपये दिले पाहिजेत असा नियम आहे. ती पुनः पळून गेल्यास तिची किंमत पंधरा रुपये होते, आणि तिसऱ्यांदा पळून गेल्यास दहाच रुपये होते. हे लोक इतके गरीब असतात की त्यांचा नेहमीचा हिशोब रुपयांत किंवा आण्यांत देखील न होतां पैशांत आणि कवड्यांत होतो, तेव्हा त्यांना दहा रुपये म्हणजे सुद्धां मोठी रकम वाटते हें लक्षांत ठेवलें पाहिजे. बायको पळून गेल्यास नवऱ्याची मुख्य काळजी म्हणजे दागिने परत मिळवणें, बायको गेल्याची मोटीशी फिकीर नसते. आणि हें ठीकच आहे, पळून जाणारी बायको परत आणण्यांत काय फायदा ?

विवाहांत जवळच्या नात्याच्या माणसांचा संबंध होतां नये हा सामान्य नियम खरा, पण त्याला फारच विलक्षण अपवाद आहेत. हिंदूंप्रमाणें आतेमामे-

भावंडांचींच लग्नें होतात असें नव्हे, तर आजाचें व नातीचें, व आजाचें व नातवाचें लग्न होऊं शकतें, व अशीं उदाहरणें अजून आहेत. घरांत वागण्याचेहि कांही नियम आहेत. बायकोने नवऱ्याच्या वडील भावाकडे पाहतां नये, त्याच्याशीं बोलतां नये, तो दिसल्यास चेहेरा झांकावा व तो असेल तेथे राहूं नये. त्याचप्रमाणे नवऱ्यानेहि बायकोच्या वडील बहिणीशीं प्रत्यक्ष बोलतां नये, किंवा ती एकटीच असेल तेथे जातां नये. सासूसासऱ्याशीं आदबीनें वागलें पाहिजे, आणि नवऱ्याने सासूचे स्तन पाहणें वाईट समजतात. या लोकांत सास्वासुनांचें तर भांडण असतेंच, पण सासूचें व जावयाचेंहि बरें नसतें. याच्या उलट बायकोने धाकट्या दिराशीं आणि नवऱ्याने धाकट्या मेहुणीशीं थट्टामस्करी करण्यास हरकत नसते. याचें कारण त्यांचें लग्न होणेंही शक्य असतें. मोठा भाऊ मेल्यास त्याच्या विधवेशीं धाकटा भाऊ लग्न करूं शकतो, तेव्हा त्याने अगोदरच थोडी लगट केल्यास चालते. त्याचप्रमाणे बायकोच्या परवानगीने तिच्या धाकट्या बहिणीशीं लग्न करतां येतें, तेव्हा लग्नाशिवायहि संबंध ठेवल्यास त्यांत कांही वावगें नाही. नवराबायको एकमेकांचीं नांवें घेत नाहीत, घेतल्यास लोक त्यांना बहिणभाऊ म्हणतात ! त्याचप्रमाणे पुरुषानें आपल्या सुनेचें किंवा भावजयीचें नांव घेतां नये, व बायकोने दिराचें किंवा सासऱ्याचें नांव घेतां नये.

बहिणभावांच्या संबंधाला जरी परवानगी नाही, तरी तो त्यांना विशेष भयंकर वाटत नाही. इतकेंच नव्हे तर त्याला काय हरकत आहे असें म्हणणारे पुष्कळ लोक भेटतात. एक नियम मात्र ते कडक रीतीने पाळतात आणि तो म्हणजे ऋतुमती स्त्रीसंबंधी निर्बंध. तिला ते अस्पृश्य मानीत नाहीत व अगदीं वेगळीहि बसवीत नाहीत, परंतु तिने पाणी आणतां नये, स्वयंपाकघरांत, गोठ्यांत किंवा शेतांत जातां नये, आणि अर्थातच समागम करतां नये. तिने नवऱ्यापासून वेगळें निजलें पाहिजे, पण ती आपल्या मुलांशेजारीं निजलेली चालते. हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती वगैरे लोक हे निर्बंध पाळीत नाहीत अशा कल्पनेने ते या सर्वांना आपल्यापेक्षा कमी प्रतीचे समजतात. बैगा लोकांत केवळ ऋतुमती स्त्रीवरच निर्बंध नसतात, तिच्या नवऱ्यावरहि असतात. स्वयंपाक

करणें त्याला भागच असतें, पण त्यानेंहि धान्याच्या कणग्याला शिवतां नये, धान्य पेरतां नये, बायकोला मारतां नये, व त्या दिवसांत इतर स्त्रियांशींहि संबंध ठेवतां नये.

हे लोक आपल्या मुलांना कामविषयक बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य देतात. अशा प्रकारचे कांही खेळ चालले असतांना आईबापांनी पाहिलें तरी तीं रागें भरीत नाहीत. कदाचित् एखादे वेळीं 'जरा वाट पहा, इतकी घाई काय आहे ?' असें म्हणतील. पण बहुधा ' मुलें उत्तेजित झाल्यास त्यांनी तरी काय करावें ? ' असेंच त्यांचें म्हणणें असतें. एकाने तर सांगितलें की माझी मुलगी मला एखाद्या मुलाबरोबर सांपडली तरी मी कांही बोलत नाही, कारण मीं तिला मारलें किंवा रागें भरलों तर शजारी म्हणतील 'सोड, जाऊं दे तिला ! ती काय तुझी बायको आहे ?' या बाबतींत मुलांना कोणत्याहि शिक्षणाची जरूर नसते. घरांत वेगवेगळ्या खोल्याच नसतात, तेव्हा आईबापांचा समागम मुलांना पाहतां येतो, आणि त्यांचें शिक्षण आपोआप होतें. सातआठ वर्षांच्या वयांत त्यांना सर्व माहिती असते इतकेंच नव्हे तर स्वतःचा अनुभवहि असतो. यामुळे मुलींची कौमार्याची शारीरिक खूण विवाहापूर्वी कधीच नाहीशी झालेली असते. मुलगी वयांत आल्यावर तिच्यावर थोडीबहुत देखरेख असते, पण त्याचा अर्थ इतकाच कीं आतां तिला काय करायचें तें चोरून करावें लागतें. परंतु हे लोक जंगलांत राहणारे, आणि पाणी आणण्याकरतां म्हणून मुलींना एकटें जाण्याची परवानगी असते, तेव्हा ही मोटीशी अडचण नसते. विवाहाचे वेळीं मात्र कौमार्याचें ढोंग केलें म्हणजे झालें. याचा अर्थ विवाहानंतर काय होणार हें पूर्णपणें माहीत असतांहि आपणास कांही माहीत नसून त्याची भीति वाटते असें दाखवायचें, आणि नवऱ्याने हात लावतांच सपाटून आरडाओरडा करायचा. याचा परिणाम म्हणजे दुसऱ्या दिवशीं नवऱ्याला सगळे लोक हंसतात. तेव्हा त्यांतल्या एका हुशार मनुष्याने सांगितलें की, त्यापेक्षा तिला फळें तोडायला किंवा मुळें खणायला म्हणून जंगलांत घेऊन जावें आणि आपलें काम उरकावें. तेथे ती ओरडली तरीहि ऐकायला कोणी नसतें आणि एर्वीतेर्वीं तें ओरडणें म्हणजे ढोंगच असतें.

या लोकांच्या लोकगीतांवरून पाहतां त्यांच्या मताने स्त्रियांचें सौंदर्य म्हणजे मुख्यतः स्तनांचें सौंदर्य—डोळ्यांना ते महत्व देत नाहीत व चुंबनाचीहि त्यांना किंमत नाही, व तसें ते प्रत्यक्ष सांगतातहि. याचें एक कारण असें असणें शक्य आहे की दोनतीन वर्षेंपर्यंत मूल अंगावर पीत असल्यामुळे ओठांचें उत्तेजकत्व नाहीसें होतें, आणि स्तनांनाहि फाजील महत्व मिळतें. बारीक कमर, रुंद जघन आणि लांब केंस यांनाहि महत्व आहे, पण कमी. स्तनांचा आकार चांगला असल्यास या सर्व गोष्टी गौण आहेत. या लोकांत स्त्रियांपेक्षा पुरुषच अधिक देखणे असतात. स्त्रिया लठ्ठ आणि बुटक्या असतात, तरीदेखील अर्थातच त्यांना त्याच सुंदर वाटतात. पण बारीक कमर फारच क्वचित् दिसल्यामुळे सुंदर वाटत असावी.

या लोकांत वेश्या अर्थातच नसतात, तेव्हा 'रांड' ही शिवी देखील त्यांना माहीत नसते. अनौरस मुलेंहि बहुधा नसतात आणि असलीं तरीहि त्यांना कोणी कमी मानीत नाहीत. ती आईची चूक, मुलांनी काय केलें आहे, असें म्हणतात. ही न्यायबुद्धि 'सुधारलेल्या' लोकांत दिसून येत नाहीं हें आश्चर्य नव्हे काय?

या लोकांना सरकारने शिकारीची बंदी केल्यापासून त्यांना उपजीविकेचें कोणतेंच धडसें साधन नाहीसें झालें आहे, आणि यामुळे ते हळूहळू नाहीसेच होण्याचा संभव आहे, कारण नांगर धरून जमिनीची लागवड करण्यांत त्यांना कमीपणा वाटतो. त्यांना चोरून शिकार करायला लावण्यापेक्षां त्यांना सरकारने कांही डोंगराळ प्रदेश आंखून देऊन त्यांत त्यांना मनसोक्त शिकार आणि त्यांच्या पद्धतीने लागवड करूं द्यावी, अशी ग्रंथकाराने शिफारस केली आहे.

---

# ग्रंथपरीक्षण

**१. उषःप्रभा.** लेखक, प्र. शां. मांजरेकर; प्रकाशक, ब. गो. गर्गे, वीणाप्रकाशन, सीताबर्डी, नागपूर. पृष्ठें १५३. किंमत सवा रुपया.

अतिशय मनोरंजक गोष्टींचा हा संग्रह आहे. प्रत्येक गोष्टींत नाविन्य

आहे. आटोपशीर व चटकदार कथानक, सुंदर भाषाशैली, आणि कोठेही पाल्हाळ न लावतां मोजक्या शब्दांत गोष्ट सांगण्याची हातोटी, असा अपूर्व त्रिवेणीसंगम उषःप्रभेंत सर्वत्र आढळतो. लेखकाची कल्पनाशक्ति दांडगी आहे, त्याचें मनुष्यस्वभावाचें निरीक्षणहि सूक्ष्म आहे, परंतु लेखक एकंदरींत करुण-रसाचा भोक्ता आहे. 'जिवंत लेखणी' या गोष्टींत तर निराशावादी लेखकाला त्यांनी कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं अशी शक्तिच बहाल केली आहे. कोणाहि एका अथवा अनेक व्यक्तींविषयी हा निराशावादी लेखक गोष्ट लिहूं लागला, की खरोखरीच त्या त्या व्यक्तींवर गोष्टींत कल्पिल्याबरहुकूम प्रसंग ओढवण्याचें अचाट सामर्थ्य त्याच्या लेखणींत असतें. एकदां सत्यसृष्टींतल्या एका सुखी जोडप्याला लेखणीच्या या अघोर शक्तीनें दुःखाच्या खाईंत लोटल्यावर स्वतःला खुनी समजून अशा तऱ्हेचा निराशावादी लेखक स्वतःच आत्महत्या करून घेतो अशी एक गोष्ट तो लिहितो, व त्याप्रमाणे होतेंहि. ही गोष्ट अत्यंत मनोवेधक आहे, परंतु आल्हाददायक नाही.

'निसर्ग' ही गोष्ट लिहिल्यावर थोडा फेरबदल करून लेखकानें 'वादळ' ही गोष्ट लिहिली. मला गोष्टीचें पहिलेंच रूप अधिक आवडतें. कोणाला दुसरें आवडेल, परंतु एकाच पुस्तकांत दोन्ही रूपें वाचून आपल्या लेखणींतून उतरलेलें कोणतेंहि लिखाण लेखकाच्यानें टाकून कसें देववत नाही, हें पाहून लेखकाविषयी सहानुभूति वाटते, आणि संग्रहाच्या शेवटींशेवटीं 'प्रेम' ही मांजरांसंबंधी लिहिलेली गोष्ट वाचून तर ही सहानुभूति द्विगुणित होते. 'मराठीमध्यें जनावरांसंबंधी अशा किती लघुकथा आहेत? सत्यसृष्टीप्रमाणे वाङ्मयसृष्टींत देखील तुमच्याकडून बिचाऱ्या जनावरांचा अनादर होतो,' हे आपल्या मित्राचे विचार लक्षांत घेऊन माजरेकर जनावरांविषयींच्या गोष्टींचा जर एखादा संग्रह छापतील, तर साहित्यांत किती नवीन प्रकारची भर पडेल! मात्र एवढेंच सांगावेंसें वाटतें की सुदैवानें शोकपर्यवसायी लेखकानें आत्महत्या केलीच आहे, तेव्हां माणसांना तसेंच जनावरांना हंसतां येतें, सुखासमाधानांत मौजेनें राहतां येतें, हें आतां लेखकानें ध्यानांत धरावें.

शकुंतला परांजपे

**२. दुहेरी जीवन**. लेखक, ग. त्र्यं माडखोलकर; प्रकाशक, शं. ब. चव्हाण, हिंदुस्थान बुक डेपो, २१ दलाल स्ट्रीट, मुंबई. पृष्ठें १४८, किं. १ रु.

ही रोजनिशीवजा कादंबरी वाचतांना जरी अगदी कंटाळा येत नाही, तरी मन कोठेंहि गुंगून जात नाहीं. पारशी, गोअन, ब्राह्मण, इंग्रज इत्यादी स्त्रियांबरोबर आलेले आपले प्रेमसंबंध नायकाने या कादंबरींत कथिले आहेत, परंतु ते सर्व काल्पनिक वाटतात. विलायती वहिवाटींचें वर्णन करतांना लेखकानें ढोबळ चुका केल्या आहेत. पृष्ठ ३४ वर लिहिल्याप्रमाणें चहाच्या वेळीं 'कटलेट' देत नाहींत, किंवा पृष्ठ ३७ वर लिहिल्याप्रमाणे बायका नाचाचे वेळीं स्लिपर्स घालीत नाहींत. तसेंच पृष्ठ ३३ वरील एक उतारा पहा. ..."आणि त्याच्याबरोबर लगेच बोटिंगला गेलों. नदीच्या पाण्याने तुडुंब भरलेलें पात्र, बंडावरून पडणारा तिचा रजतशुभ्र प्रवाह"...बोटिंग करीत असतां बंडावरून पडणारा नदीचा प्रवाह दिसेल इतक्या जवळ गेल्यास होडी आणि खलाशी दोन्हीं त्या प्रवाहांत मिसळून खलास होतील.

हिंदी राजकारण, साम्यवाद, संप, निवडणुकी, जिनीव्हा, इत्यादि बरेच विषय या कादंबरींत हाताळले आहेत, परंतु त्यांत अंतःकरणाची आंच किंवा बुद्धीची ओढ कोठेंहि आढळत नाही. नायक श्रीमंत आहे, सुंदर आहे, कवि आहे, लेखक आहे; खेळण्यांत, वल्हवण्यांत, नाच करण्यांत, व्हायोलिन वाजवण्यांत, तो पटाईत आहे. तो कामगारांचा पुढारी होतो, उत्तम वकिली करतो, व हिंदुस्थानांतील कामगारांचा प्रतिनिधि म्हणून जिनीव्हाला जातो. सत्यसृष्टींतील जिवंतपणा मात्र त्याचे ठायीं आढळून येत नाहीं. कथानकांतील इतर पात्रेंहि बेगडी वाटतात. नाही म्हणायला नायकाची बायको सुलोचना तेवढी सत्यस्वरूप वाटते व कथानकाला सुरवात होण्यापूर्वी तिच्या हस्तें लिहवलेला उपोद्घात मात्र खरोखरीच सुंदर आहे.

**शकुंतला परांजपे**

---

# क्लीबनीतीचा प्रसार

यूरोपांतून येईल तेवढें चांगलें मानणाऱ्या लोकांमुळे क्लीबनीतीचा कसा झपाट्याने प्रसार होत आहे, हें पुढील उताऱ्यावरून दिसून येईल. हा उतारा एका अमेरिकन बाईने लिहिलेल्या 'चाइनीज वीमेन यस्टरडे अँड टुडे' या पुस्तकांतून घेतला आहे आणि तें १९३८ सालीं प्रसिद्ध झालेलें आहे.

"चीनमध्यें आतां रखेली ठेवणें कायदेशीर नाही. ज्यांच्यांत एकेरी विवाहपद्धति रूढ आहे, अशा लोकांना याचें महत्व नीटसें कळणार नाही. परंतु चीनमधे रखेलीची पद्धत फार प्राचीन काळापासून रूढ आहे. आतां रखेल्या कायद्याने अस्तित्वांत नाहीत, आणि पतीने दुसऱ्या स्त्रीशीं संबंध ठेवला एवढ्या कारणावरून पत्नीला सोडलग्नाची मागणी करतां येते. स्त्रिया आतां कामविषयक कायद्यांत आणि नीतींत समान हक्क मागतात, आणि त्यांचें आज किती वजन आहे हें पाहिलें म्हणजे त्यांच्या म्हणण्याप्रमाणेच अखेर होईल यांत शंका घेण्याचें कारण नाहीं. शिवाय नव्या कायद्याने फक्त औरस मुलांनाच मिळकतीवर हक्क असतो.

"अर्थात् यामुळे कांही घोटाळे उत्पन्न होतात. या देशांत आतां व्यभिचार हा नवीन गुन्हा उपस्थित झाला आहे...याचे परिणाम काय होतात हें पुढील गोष्टीवरून समजेल. स्त्रियांना आपल्या हक्कांसंबंधी कायदेशीर माहिती पुरवणारी एक स्त्रियांची संस्था आहे. तेथे एक स्त्री तक्रार घेऊन आली. श्री. चंगशीं तिचें लग्न बावीस वर्षांपूर्वी झालें, व दोन वर्षांपूर्वी त्याने एक रखेली ठेवली होती. नव्या कायद्याप्रमाणे त्याला रखेली ठेवण्याचा हक्क नाही, तेव्हा ती रखेली कायद्याने काढून टाकावी असें तिचें म्हणणें. तिला मदत करण्याकरतां म्हणून वकिलाने सांगितलें की 'मी त्या दोघांशीं विचारविनिमय करून काय करतां येईल तें पाहतों.'

" वकिलानें चँगला बोलावलें. तो म्हणाला ' मी जेव्हा रखेली ठेवली, तेव्हा बायकोच्या संमतीनेच ठेवली. ही समाजाची रूढिच होती. मी आजारी होतों, माझी काळजी घ्यायला कोणीतरी पाहिजे होतें, आणि बायको दुसऱ्या प्रांतांत रहात होती, ती माझ्या नोकरीच्या जागीं यायला तयार नव्हती. तेव्हा रखेली ठेवायला तिची परवानगी मिळवुन एका मध्यस्थामार्फत रखेली ठेवली.''

" नंतर वकिलाने रखेलीला बोलविलें. तिने सांगितलें की ' माझी आई अत्यंत गरीब असल्यामुळे तिनेच माझ्याकरतां ही रखेलीची जागा मिळवली. चँगने मला कपडे घ्यायला ८० डॉलर्स पाठवले आणि मला न्यायला एक रिकशॉ पाठवली. ' हें सामाजिक रूढीला धरून झालेलें होतें, आणि चँगला सोडायची तिची इच्छा नव्हती.

" येथे वकील काय करणार, आणि या सर्वांना सुखकर असा यांतून कोणता मार्ग काढणार ? जुन्या कायद्याप्रमाणे रखेली ठेवण्याचा हक्कच होता आणि तेव्हा तर नवऱ्याला जरूर असतांना बायको नवऱ्याकडे जायला तयार नव्हती. रूढीप्रमाणे तिच्या संमतीनें ही गोष्ट केली म्हणजे ती पक्की झाली. जुन्या कायद्याखालीहि कुटुंबांत कदाचित् भांडणें झालीं असतीं, परंतु तीं चव्हाट्यावर आलीं नसतीं. पण आतां तसें नाही, बायकोला स्त्रियांच्या हक्कांची जाणीव झाली आहे आणि ती त्यांतून सुख मिळवूं पाहते. रखेलीलाहि नवीन स्वातंत्र्याची कुणकुण लागली आहे आणि तीहि त्यांतून सुख मिळवूं पाहते. नवरा मात्र स्वातंत्र्य, समान हक्क, वगैरे शब्दांनी गोंधळून गेला आहे. त्याचे मतें अशा गोष्टी वकिलापुढे आणणें ही बायकोची चूक आहे. ती आपल्याला नवी म्हणते पण तो तिला जुनीच समजतो. तो म्हणतो की तीच रखेली घरांत राहून नोकरासारखी काम करील तर बायको हरकत घेणार नाही. आणि बायको हें कबूल करते. ती म्हणते रखेलीने आपली पायरी ओळखून वागावें.

" अशा स्थितींत वकील काय सांगेल ? बायकोने सोडलग्नाची मागणी करावी ? पण तिला तें नको आहे, कारण नवऱ्याने सोडचिठ्ठी दिली तर ती जाणार कोठे ? रखेलीचा संबंध बेकायदा आहे असें ठरवावें ? पण मग तिलाहि कोठे जायला जागा नाही. तिने रुढीप्रमाणे घरांत नोकरासारखें राबावें ? ती तेंहि करायला तयार नाही. त्या दोघींचा दर्जा सारखा समजावा ? पण याने भांडणां-शिवाय दुसरें काय होणार ? नवऱ्याला हें कळत नाही की हें सगळें कां उपस्थित झालें ? आजपर्यंत नाही लोकांनी रखेल्या ठेवल्या ? तो आजारी होता, तेव्हा त्याला जरूर लागली म्हणून त्याने ठेवली. मग आतां कायदा बदलला म्हणून काय तो व्यभिचारी झाला ? तो रूढीप्रमाणे वागला हा काय त्याचा गुन्हा झाला ? पण बायका आतां त्याला व्यभिचार म्हणून नवऱ्यावर फौजदारी करतात. पण स्वातंत्र्य त्यांनाच जड जाईल. समजा ही बायकोची कटकट नको असें वाटून तिला घटस्फोट मागायला भाग पाडण्याकरतां एखाद्या नवऱ्याने तिला छळायला सुरवात केली तर ? कित्येक शतकें चालत आलेली रूढि कायद्याने बदलत नाही."

[ ती बदलणें इष्ट तरी आहे काय ? स्त्रियांनी वाटल्यास स्वतंत्र रहावें, पण जगायचें नवऱ्याच्या जीवावर, आणि शिवाय त्यालाच कायद्याने जखडायला पहायचें, हें स्त्रियांना जड जाईल. **संपादक** ]

---

# पत्रव्यवहार

## १

१. जानेवारी १९४० च्या आपल्या मासिकावर जानेवारी १९३९ असें छापलेलें आहे व चुकीची दुरुस्ती फेब्रुवारीच्या अंकांतहि नाही. असें कां ? २. जानेवारीचा अंक नेहमीपेक्षा मोठा आहे व किंमतहि चार आणे आहे. तरी असा विशेषांक आपण प्रत्येक जानेवारीस काढतां काय ? याचा कोठेच खुलासा नाही. दुसरें, मुखपृष्ठावर किंमत देतांना ४ आणे लिहिलें आहे. परंतु चित्र मात्र दुणीचें आहे. हें थोडें विसंगत नाही कां ? ३. फक्त मासिकाच्या मुखपृष्ठावरील कोप-

त्यांत तारीख, महिना व साल असतें. तें कांही कारणाने नाहींसें झालें तर दुसऱ्या कोठे ही माहिती मिळत नाही. तरी ही गैरसोय आपल्याला दूर करतां येईल का? ४. आपल्या मासिकांतील जाहिराती, आपल्या कंपनीच्या व इतरांच्या, शंभर टक्के खात्रीशीर धरून चालावें काय? पूर्ण विश्वास ठेवून तो माल घ्यावा काय? ५. कामोत्तेजक औषधें सगळीकडेच एवढीं महाग कां? यांतील जिनसाच दुर्मिळ असतात, की तयार करणें कठिण असतें, किंवा सर्वांचींच महाग असल्याने व आपल्या औषधाची किंमत कमी ठेवल्याने महत्व कमी होतें, व खप होण्याचा संभव कमी हें व्यापारी धोरणच त्याच्या बुडाशीं आहे? ६. आम्ही राइट एजन्सीची डच कॅप व सेक्सस पेस्ट वगैरे साधनें दोन वर्षांपासून वापरीत असतों. आपल्या मासिकांत आणखीही आपल्याच कंपनीच्या निरनिराळ्या जेली, वड्या वगैरे संततिप्रतिबंधक साधनांची जाहिरात असते, तर आणखी साधने कशाला? यांतलीं सोयीचीं, कमी खर्चाचीं व उपयुक्त अशीं कोणतीं? अथवा निरनिराळ्या परिस्थितींत निरनिराळीं साधने असें कांही आहे काय? ७. डच कॅप वापरल्याने स्त्रियांची कामवासना थोडी कां होईना अतृप्त राहते असें आपल्याकडे कोणाकडून गाऱ्हाणें आलें आहे काय? अथवा हें खरें असूं शकेल का? ८. समागम बऱ्याच दिवसांनी मिळाला म्हणजे पहिल्या दिवशीं लवकर स्खलन होतें हें साहजिक आहे का? नसल्यास यावर कांही उपाय आहे का? ९. रेतस्खलन फाजील लवकर होत असल्यास काय उपाय करावा? कित्येकांना आगंतुक कारणांनी असें होत असेल किंवा कित्येकांना मूळचेंच असेल. तरी याला निरनिराळे उपाय आहेत का व ते कोणते? १०. रेतस्खलन लवकर झाल्यानें स्त्रियांच्या प्रकृतीवर कांही परिणाम होतो का? व त्यापासून अपस्मार, फिट्स् वगैरेसारखे रोग होतात हें खरें आहे का? अशा वेळीं पुरुषांनी कोणता आहार ठेवावा? ११. अपस्मार, फिट्स् वगैरेवर काय नक्की उपाय आहे? अशा रोग्याने कोणता आहार ठेवावा? १२. गुप्तरोगप्रतिबंधक जेलोट्यूब वापरून कोठेहि बिनधोक समागम करावा का? १३. समागमाचे वेळीं शिमग्यांतले शब्द जिभेने उच्चारण्याची तीव्रतर इच्छा होते असें आपल्याला

दुसरीकडून कोठून समजलें आहे काय ?

उ. १. अशी चूक फक्त कांही प्रतींवरच झाली होती, ती दुरुस्त करण्याचें राहून गेलें. २. गेलीं तीन वर्षें जानेवारीचा अंक मोठा काढीत आहों, व पुढेंहि काढण्याचा विचार आहे. मुखपृष्ठावर किंमत चौकोनांत लिहिली आहे, परंतु त्या चौकोनाला दुणेलीचें चित्र म्हणण्याचें कारण दिसत नाही. ३. महिना आंतहि देण्याची व्यवस्था करूं. ४. फक्त आमच्या जाहिरातींच्या खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों, इतरांच्या नाही. ५. आपण म्हणतां तीं सगळींच कारणें थोडींबहुत खरीं आहेत. मात्र आमचे औषधाची किंमत पूर्वी तीन रुपये होती, ती लढाईत औषधें महाग झाल्यामुळे वाढवावी लागली आहे. ६. सर्वांत उत्तम साधनें म्हणजे डच कॅप व जेली [ पेस्ट ] हींच, व हें आम्ही नेहमी सांगतों. तथापि कांही लोकांना इतर साधनें सोयीचीं वाटतात व ते तीं मागतात, म्हणून आम्ही विकतों. ७. कांही स्त्रियांचे बाबतींत असें होणें शक्य आहे, परंतु अशा स्त्रियांचें प्रमाण फारसें नाही. ८. हें साहजिकच आहे. ९. यावर उपाय करणें कठिण आहे व सर्वांस लागू पडेल असा उपाय सांगतां येणार नाही. हा मुख्यतः क्लीबनीतीचा परिणाम आहे. समागम हें पाप मानण्याच्या प्रवृत्तीचा मनावर परिणाम होतो, आणि हा रोग मुख्यतः मज्जातंतूंचा आहे व त्यावर मनाचा परिणाम फार होतो. १०. 'फिट्स्' असा वेगळा रोग नाही. अपस्माराचीं कारणें पुष्कळ असतात. कामशांति न झाल्यामुळें फिट्स् येणें शक्य आहे, परंतु हें प्रकृतीवर अवलंबेल. शीघ्रपतन हा रोग केवळ आहाराने बरा होण्यासारखा नाही. तथापि योग्य आहाराने एकंदर प्रकृतीला फायदा होऊन त्याचा थोडा-बहुत परिणाम होईल. ('आधुनिक आहारशास्त्र' पहा). ११. कारण समजल्यास तें दूर करणें हा मुख्य उपाय. एरवीं या रोगांवर चांगलेसे उपाय नाहीत. डाक्तर तात्पुरते उपाय करूं शकतात.:—कपडे सैल करणें, वारा घालणें, शक्य तितकी मोकळी हवा मिळूं देणें, तोंडावर पाणी मारणें, वगैरे. फिट् येणार असें समजल्याबरोबर पायाचा अंगठा जोराने बांकवावा, हा एक उपाय डॉ. ब्राउन-

सिकार यांनीं दिला आहे. आहारासंबंधी वर सांगितलेलें आहे तें पहा. १२. ' जेलोटयूब ' ने संसर्गाचा धोका नाहीसा होतो. कोठेहि समागम करावा की काय, हा आमचा प्रश्न नाही. १३. असें आम्हास कोणीं अजून लिहिलेलें नाही. तथापि वात्स्यायनाच्या कामसूत्रांत ' सकलचतुःषष्टिप्रयोगरागिण्योऽश्लीलपरुषवाक्यप्रियाः शयने च सरभसोपक्रमा महाराष्ट्रिकाः' असें वाक्य आहे. यांत महाराष्ट्रीय स्त्रियांना ' अश्लीलपरुषवाक्यप्रियाः ' हें विशेषण लावलें आहे, त्यावरून असें अनुमान काढण्यास हरकत दिसत नाही. सं.

## २

१. आमचे इकडेस एक वैद्य असून त्यांनी होमिओपाथीच्या धर्तीवर एक वैद्यकपद्धति काढली असून त्याप्रमाणे ते औषधोपचार करीत असतात, व आपल्या पद्धतीचें त्यांनी एक पुस्तकहि प्रसिद्ध केलें आहे. त्यांत ते एके ठिकाणीं म्हणतात की ज्याप्रमाणे नुसती वनस्पति खाण्यापेक्षा तिचा काढा करून प्याल्यास तो अधिक परिणामकारक होतो, त्याचप्रमाणें पाणी तापवून प्याल्यास त्यांत रोगजंतु असल्यास त्याचा काढा तयार होतो, व तो थंड पाण्यापेक्षा अधिक बाधक होतो. म्हणून पाणी कधी तापवून पिऊं नये, गाळून अगर फिल्टर करून प्यावें. याबद्दल तुमचें मत काय ? २. इकडेस एका माणसाचे पाठीस कॅन्सर झाला होता ( पुळी ). पुष्कळ भोंकें पडलीं होतीं. वैद्यांचे व डाक्तरांचे पुष्कळ उपाय झाले, परंतु मुळीच गुण न येतां रोगी दगावण्याचे पंथास लागला. नंतर एका खेडवळ वैद्याने दुकानावरील डब्याचें खोबरेल आणून त्याच्या घड्या घालण्यास सांगितल्या. कापूस खोबरेलांत भिजवायचा व वर घालायचा, असें दिवसांतून दहाबारा वेळां करायचें. असें दीड महिना केल्यानंतर रोगी साफ बरा झाला. सुमारें १३–१४ रत्तल तेल लागलें. तो वैद्य म्हणे की मीं असे बरेच रोगी बरे केले आहेत. तरी खोबरेल तेलांत असा कांही गुण आहे काय ? ३. तुमचे ' संततिनियमन ' पुस्तकांत डॉ. रॉबिनसनचा गरिबांसाठी खात्रीचा म्हणून एक उपाय दिला आहे. त्यांत संभो-

गापूर्वी औषधी पाण्यांत बुचकळून कापसाचा बोळा योनिमार्गांत फिरवण्यास सांगितलें हें ठीक. परंतु तसाच तो संभोगानंतर पुन्हा फिरवण्यांत आमचे मतें धोका आहे, कारण योनिमार्गात पडलेलें रेत बोळयाबरोबर गर्भाशयाचे मुखास लागेल व त्यामुळे गर्भधारणेचा संभव वाढेल. यावरून पुन्हा संभोगानंतर बोळा फिरवण्यांत फायद्यापेक्षां धोकाच अधिक आहे असें आपणास वाटतें काय? ४. यापेक्षा एक रबरी स्पंजाचा तुकडा पाण्यांत टाकावा, म्हणजे तो पाण्यानें भरेल. नंतर त्याजवर चांगल्या साबणाची वडी हलक्या हाताने सर्व बाजूंनी घासावी, व तो संभोगापूर्वी योनिमार्गांत घालून गर्भाशयाचे मुखापर्यंत ढकलावा व नंतर योनिमार्गांत दोन बोटांचे चिमटीने पिळावा, म्हणजे आंत बरेंचसें फेसाळ पाणी जाईल व त्याची पृष्ठओढ कमी असल्यामुळें चटकन् जिकडेतिकडे होईल. या उपायाचा वरीलप्रमाणेच उपयोग होणार नाही काय? आपला क्ष

उ. १. सदर वैद्यास आयुर्वेदाची काय माहिती असेल ती असो. परंतु आधुनिक वैद्यकीय ज्ञान शून्यापेक्षा फारसें जास्त नाही हें उघड आहे. रोगजंतूंची ज्याला थोडीबहुत माहिती आहे, तो त्यांचीं वनस्पतींशीं तुलना करणार नाही. 'पाणी तापवून प्यावें' असें कोणी म्हणत असल्यास ती चूक आहे. रोगजंतु मरण्यास केवळ पाणी तापवून पुरत नाही, तें पंधरावीस मिनिटें उकळत राहिलें तरच त्यांतील रोगजंतु मरतात, व मग त्यांपासून भीति रहात नाही. यांचा काढा झाला तरी चालतो. पाणी गाळण्यानें फारतर त्यांतला केरकचरा निघेल, जंतूंना त्याने कांही होणार नाही. शास्त्रीय पद्धतीचें मातीचें फिल्टर वापरलें तरी त्यानेहि रोगांचा संभव अजीबात नाहीसा होतो असें नाही, कारण त्यांतून पार होतील असेहि कांही रोगोत्पादक पदार्थ असतात. उकळल्याशिवायहि पाण्यांतील जंतूंचा नाश करण्याचा एक सोपा उपाय आम्ही पूर्वीच दिला आहे. २ पुळ्या पुष्कळ प्रकारच्या असतात. आपल्या वर्णनावरून तो कॅन्सर असावा असें दिसत नाही. कॅन्सरवर रामबाण उपाय अजून सांपडलेला नाही. ३. डॉ.

रॉबिनसनपेक्षा आपण अधिक तज्ञ आहांत अशी आपली कल्पना दिसते, तथापि ती खरी नाही. समागमाचे वेळीं रेत गर्भाशयाचे मुखास लागत नाही, आणि तें नंतर बोळयाने लागेल, हें जवळ जवळ अशक्य आहे. शिवाय बोळा जंतुनाशक औषधांत बुचकळलेला असल्यामुळे तसें झालें तरीहि धास्ती नाही. फक्त अगोदरच बोळा फिरवून नंतर न फिरवल्यास त्याचा उपयोग होणार नाही, नंतरहि फिरवणें जरूर आहे. शिवाय तरी देखील हा उपाय डच कॅप व जेली यापेक्षा कमी खात्रीचा आहे. ४. आपण सुचवलेला उपायहि यशस्वी होऊं शकेल, पण स्पंज केवळ पिळून बाहेर न काढतां आंतच राहूं देणें जरूर आहे. अर्थात् साबण कितपत जंतुनाशक आहे यावर परिणाम अवलंबेल. **सं.**

---

# शारदेचें पत्र

चितपावन लोक इतके बावळट असतील अशी माझी कल्पना नव्हती. ते हुशार असतात अशी एक अफवा मीं ऐकली होती, पण ती खोटी असल्याचा प्रत्यक्ष पुरावा त्यांनी परवां पुण्याला चितपावनांची परिषद् भरवून दिला आहे. त्यांनी आपलें नांव ‘ चित्तपावन ’ असें लिहायची एक टूम काढली आहे पण तिला कांही आधार आहे असें वाटत नाही. काय जे त्या परिषदेंत एकएकाने तारे तोडले आहेत ! त्याचा उत्तम मासला म्हणजे शंकरराव लवाट्यांचा ठराव. तो काय, तर म्हणे धार्मिक भावनांचा होत असलेला ऱ्हास टाळावा. असले ठराव पास करून तो ऱ्हास आतां टळणार आहे ! मुठा नदी हल्लीच्या उलट दिशेने वहायला लागावी असा ठराव पास करण्यापैकीच प्रकार आहे हा. धर्माच्या ऱ्हासाची एक खूण त्यांनी सांगितली ती अशी की ‘ आज विशेषतः शाळाकॉलेजांतील विद्यार्थ्यांकडे पाहतांच तो धर्माने व जातीने कोण अ ओळखूं येत नाही, प्रौढ गृहस्थांची बाह्य पोषाखावरून ओळख पटत नाही. ’

हे अजब शोध आहेत. हिंदु धर्माचा अमुक असा पोषाख ठरलेला नाही आणि चितपावनांचा देखील पोषाख ठरलेला आहे असें वाटत नाही. मग चितपावनांनी अमुक प्रकारचा पोशाख करावा असाच ठराव कां नाही आणला त्यांनी ? यांचा धर्म पोषाखावर अवलंबून असतो ! साहेबी टोपी घातली की पुष्कळ लोक किरिस्तांव म्हणतात हें मला माहीत आहे, पण अमुक पोषाख घातला की तो हिंदू समजावा असें कोणाला सांगतां येईल का ? ब्राम्हणाचा पोषाख कशाला म्हणावें हें लवाट्यांना सांगतां येईल का ? ब्राह्मणांचा पोषाख म्हणजे वसिष्ठ ऋषींचा समजायचा, की पहिल्या बाजीरावाचा ? पेशवे जर लढाईवर जातांना विजारी घालीत असत, तर आतां ज्याला जो सोयीचा पडेल तो पोषाख त्याने केला तर बिघडलें कोठे ? इतका बेअकलीपणा चितपावनांनी दाखवावा ? शिवाजीला धर्माचा अभिमान होता की नाही ? मग तो मोंगलांसारखा पोषाख कां करीत होता ? ओळखण्यासारखे इतर गुण अंगांत नाहीत, तेव्हा आतां निदान ओळखण्यासारखा पोषाख तरी केला पाहिजे, असें म्हणण्यापर्यंत पाळी यावी, हा चितपावनांचा खरा ऱ्हास आहे. म्हणे 'स्त्रियांनी आमची लाज राखली आहे, पण या महिलाहि पुढे अशाच राहतील की नाही याची वानवा आहे.' लवाट्यांच्या मताने सर्वांत उत्तम गुण कोणता ? तर कोणत्याही प्रकारचा फरक न होणें. एकंदरींत त्यांच्या मताने माणसांपेक्षा दगड श्रेष्ठ ठरतात, कारण त्यांच्यांत फरक सर्वांत कमी होतो. जे पारंपरिक दगड असतील त्यांच्यांत कसला फरक व्हायचा आहे ? प्रगति म्हणजे काय याबद्दल जरी मतभेद झाला, तरी प्रगति म्हणजे फरक आहे, जें असेल तें तसेंच राहणें याला कोणीहि प्रगति म्हणणार नाही. पण शंकरराव लवाट्यांना पोषाख कायम टिकायला पाहिजे आहे. ब्राह्मणांच्या किंवा चितपावनांच्या पोषाखांत काय आजच फरक होतो आहे ? फरक होणें हा जगाचा नियम आहे आणि तो कोणालाहि टळत नाही. पण फरक म्हणजेच ऱ्हास असें लवाट्यांना वाटतें असें दिसतें. पोषाखासंबंधी त्यांना कांही नवीन कल्पना सुचल्या तर त्यांनी सुचवाव्या, पण आहे तें कायम राहणें कधीही शक्य नाही. तें आजपर्यंत बद-

लतच आलेलें आहे आणि पुढेहि बदलणार.

पुण्याच्या रस्त्यांवर इराणी हॉटेलें पाहून त्यांना वैषम्य वाटतें. हा आजीबाईपणा आतां किती दिवस चालणार ? पुण्यासारख्या शहरांत राहूनहि ही खेडवळ मनोवृत्ति कायम ठेवणारे शंकरराव लवाटे धन्य म्हटले पाहिजेत ! न बदलणाऱ्या दगडाचीच उपमा त्यांना रास्त आहे. सगळे ब्राह्मण दगड नसले, तरी निदान सर्वांचे पुढारी जे चितपावन, त्यांनी तरी दगड बनावें असा त्यांचा आग्रह आहे. हा ठराव बहुमताने पसार झाला यावरून ते अजून दगड बनले नसले तरी दगड बनण्याची त्यांची तयारी दिसते. आणि हे 'सर्वांचे पुढारी !' लाजहि वाटत नाही बोलायला !

लोकांच्या घरीं इंग्रजी ग्रंथ असतात, याबद्दल सुद्धां त्यांना विषाद वाटतो. आधुनिक ज्ञान इंग्रजी पुस्तकांत असतें आणि मराठी किंवा संस्कृत पुस्तकांत नसतें, हें कबूल केल्याशिवाय गत्यंतर नाही. मग मराठी भाषा जर कधीं संपन्न व्हायची असेल, तर हें इंग्रजी ग्रंथांतलें ज्ञान जेव्हां मराठी ग्रंथकार आत्मसात् करतील तेव्हाच तें होणें शक्य आहे. मग इंग्रजी ग्रंथ न वाचून कसें होईल ? याबद्दल खेद वाटून कांही उपयोग नाही. आहे त्या परिस्थितींत ते वाचल्याशिवाय गत्यंतर नाही, हें ओळखून ते वाचणारालाच कांही अक्कल आहे असें समजतां येईल. लवाटे म्हणतात, 'अध्यापकवर्ग हे ग्रंथ वाचतो आणि आचरतो आणि विद्यार्थ्यांना ते आचरायला सांगतो.' 'न वदेद्यावनीं भाषां प्राणैः कंठगतैरपि' हें आमच्या पूर्वजांचें शहाणपण आतां शंकरराव लवाटे आम्हाला पुन्हा समजावून सांगत आहेत, आणि त्यांच्या सांगण्यावरून ही चितपावनांची परिषद् असले ठराव पास करते. चितपावनांच्या अकलेची तारीफ करावी तेवढी थोडी आहे !

ते आणखी पुढे सांगतात की 'अध्यापकवर्ग ईश्वर मानणारा असला पाहिजे आणि भारतीय संस्कृतीस मानणारा असला पाहिजे.' छान ! शंकरराव लवाट्यांना ट्रेनिंग कॉलेजवर प्रिन्सिपल नेमावे ! ईश्वर मानणें हें बुद्धिदौर्बल्य

आहे. कांही लोकांना ईश्वर दिसतो असें म्हणतात, पण ज्याला स्वतःला तो दिसला नाही, त्याने तो मानणें म्हणजे एकतर ढोंग असलें पाहिजे, किंवा केवळ दुसऱ्यावर विश्वास ठेवून तो मानला पाहिजे. 'मूढः परप्रत्ययनेयबुद्धिः' हें संस्कृत वाक्य असल्यामुळे लवाट्यांचा त्यावर विश्वास असेलच, आणि नसला तरी देखील तें खरें आहे. असा मूढ मनुष्य अध्यापक झाला तर तो मुलांना आपल्यासारखाच मूर्ख बनवण्याचा प्रयत्न करणार. किंवा अध्यापक ईश्वर मानणारा असला पाहिजे असें त्याला कळलें, म्हणजे तो अध्यापकाची जागा मिळवण्याकरतां ईश्वर मानतों असें म्हणणार. आणि या बेकारीच्या दिवसांत त्याला कोण नांवें ठेवील ? भारतीय संस्कृति मानायची म्हणजे काय करायचें हें लवाट्यांनी सांगितलेलेंच नाही, तेव्हा त्यांत शिरण्यांत कांही अर्थ नाही.

अध्यक्ष महाराजांनी सांगितलें की वैदिक काळची संस्कृति अंमलांत आणली पाहिजे. त्या वेळीं चितपावन होते असें वाटत नाही आणि जे कोणी ब्राह्मण होते ते गोमांस व इतर मांसहि खात होते. तसेंच आतांहि करावें असेंच त्यांना सांगायचें होतें काय ? आणि लवाट्यांची भारतीय संस्कृति म्हणजे हीच तर नव्हे ?

या परिषदेने आणखीहि कांही ठराव पास केले. इंग्रजी पांचव्या इयत्तेनंतर सहशिक्षण असूं नये असा एक ठराव झाला. सहशिक्षण आहेच कोठे रडायला, तर तें असूं नये म्हणून ठराव करायची जरूरी त्यांना भासली ? मुलांमुलींनी एका वर्गांत बसणें याला काय सहशिक्षण म्हणतात ? 'आशा' म्हणते, 'बुद्धिमान आणि सुधारणाप्रिय समजल्या जाणाऱ्या या ज्ञातीला सहशिक्षणाची भयंकर काळजी पडल्यासारखें दिसतें.' ब्राह्मणाच्या पोटजातींत देखील लग्नें झालेलीं त्यांच्या अध्यक्षांना पसंत नाहीत, आणि हे म्हणे सुधारणाप्रिय ! इराण्यांचीं दुकानें पाहून जे घाबरतात, ते काय सुधारणा करणार ! लग्नासंबंधीं त्यांनी असा ठराव केला की मुलांचे लग्न २७ वयाचें आंत आणि मुलीचें २० चे आंत करावें. ही बुद्धिमान लोकांची अक्कल ! वीस आणि

सत्तावीस वर्षेंपर्यंत वय वाढूं दिल्यानंतर तीं मुलें आईबापांच्या सांगण्यावरून लग्न करणार आहेत होय ? कायद्याप्रमाणे चौदा वर्षे पुरीं होतांच मुलीचें लग्न करतां येतें, त्या वेळीं ती आईबापांचें ऐकण्याचा संभव असतो. पुढें तें कठीण जाईल आणि मुलगा २७ वर्षांचा झाल्यावर तर तें अशक्यच आहे. पण अध्यापकच ज्यांना मूर्ख पाहिजे आहेत, त्यांना स्वतःची अक्कल किती असणार ? ठीक आहे, प्रयत्न करून पहा म्हणावें अशा वयांत मुलगे किंवा मुली ऐकतात की काय. म्हणजे थोडी अक्कल येईल. धर्मभेद आणि जातिभेद यांचा पुरस्कार केल्याने बुद्धिभेद मात्र होतो, आणि हे बुद्धिमान लोक एका धर्माच्या लोकांत सुद्धां एकजूट होऊं नये अशी खटपट करीत आहेत. हें बुद्धिभ्रंशाचें लक्षण आहे, बुद्धिमत्तेचें नव्हे.

येथे इतक्या संगीतपरिषदा झाल्या, पण त्यांना जी अक्कल सुचली नाही किंवा जें धैर्य झालें नाही, तें ऑल इंडिया रेडियोनें पेटीचें उच्चाटन करून प्रत्यक्ष करून दाखवलें, याबद्दल त्यांचें खरोखर अभिनंदन करणें जरूर आहे. तंबुरा लावायला त्रास पडतो, म्हणून आळसाने पेटीच्या सुरावर हिंदुस्थानी संगीत शिकवण्याचें ढोंग करणाऱ्या सगळ्या संगीतशिक्षकांना लाजेने मान खाली घालण्याचा हा प्रसंग आहे. पण त्यांना फारशी लाज असते असें वाटत नाही. शिकणारांनी तरी यापासून धडा घ्यावा, आणि कोणत्याहि पेटीवाल्या शिक्षकाला थारा देऊं नये. पेटीवर शिकलेलें तें हिंदुस्थानी संगीत नव्हे, तो धेडगुजरी गोंधळ आहे.

तुझी **शारदा.**

---

# अन्नाचा प्रश्न

—:०:—

लार्ड ल्यूक यांनी नुकताच असा हिशोब सांगितला की शंभर एकर जमिनींत गहूं पिकवला तर त्यावर २०८ माणसांचें वर्षभर पोट भरतें, पण तेवढीच जमीन गाईंना चरायला ठेवून त्यांचें दूध वापरलें तर त्यावर फक्त ४१ माणसांचें

पोट भरतें, आणि त्याच जमिनीवर गुरें चारून त्यांचें मांस खाल्लें तर फक्त ९ माणसांचें पोट भरेल ( ' न्यू जनरेशन् ' ).

यावरून कोणी असा तर्क करील की असें आहे तर सर्वत्र धान्यच पिकवून खावें, दूध किंवा मांस खाऊं नये, कारण आज जगांत अन्नाचा तुटवडा आहे. परंतु या सर्व पदार्थांची अन्नाच्या दृष्टीने किंमत सारखी नाही. पालेभाज्या, फळें, दूध, अंडीं, मांस, वगैरेंना जास्त जमीन लागते, परंतु हे पदार्थ ज्यांना मिळतात तेच लोक जास्त सुदृढ प्रकृतीचे असून जास्त जगतात. न्यू झीलंडमधें हे पदार्थ विपुल आहेत, तेथे मनुष्याचें सरासरी आयुष्यमान ६६ वर्षें आहे, ऑस्ट्रेलियांत ६५ आहे, इटलींत ५४, आणि जपानांत ४५ आहे. हिंदुस्थान व चीन याच्या फारच खाली आहेत. याचें मुख्य कारण असें की हिंदुस्थान, चीन, जपान आणि कांही अंशी इटली, या देशांत प्रत्येकाच्या वांट्याला सरासरीने इतकी कमी जमीन येते की त्यांना मुख्यत्वेंकरून धान्यांवरच निर्वाह करावा लागतो, आणि न्यू झीलंडसारख्या ठिकाणीं लोकसंख्येच्या मानानें पुष्कळ जमीन असल्यामुळे तेथील लोक अंडीं, मांस, दूध वगैरे खाऊं शकतात. हा लोकसंख्येचा प्रश्न आहे, समाजवादाचा नाही, कारण जेथे पुरेसें अन्नच नाही, तेथे सारखी विभागणी केल्याने सर्वांचीच उपासमार होईल, आणि हल्ली निदान कांही लोकांना पोटभर अन्न मिळतें तेंहि नंतर मिळणार नाही.

---

**शोचनीय निधन :** आमचे एक चहाते वर्गणीदार श्री. वा. चिं. देव, हे पुणें मुक्कामीं २२ एप्रिल रोजीं हृदयाचे विकाराने वारले असें त्यांचे चिरंजीव कळवतात.

**आमचा खटला :** १ मेला फक्त भाषांतरकाराची साक्ष होऊन १७ मेपर्यंत पुढे ढकलला.